Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ९] गुरुवार ते बुधवार, मार्च ४-१०, २०२१/फाल्गुन १३-१९, शके १९४२ [ पृष्ठे ६, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४२.

### विभागीय आयुक्त, यांजकडून

**महाराष्ट्र ग्रामपंचायतीचे संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ अंतर्गत नियम ४ अन्वये गाव जाहीर करण्यासाठी अधिसूचना**

**शुद्धीपत्र**

क्रमांक मशा-कार्या-७(३)-प्र.क्र. ०६-२०१६.—

या कार्यालयातील पत्र क्रमांक मशा-७(३)-सिआर-६-२०१६, दिनांक २४ सप्टेंबर २०२० अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-अ नागपूर विभागीय पुरवणी, दिनांक ऑक्टोबर १५-२१, २०२०, पान क्रमांक ११ व १२, अ.क्र. ११२ वर परिच्छेद ५ मध्ये चुकीने आगरी गावाऐवजी कुंभीटोला येथील वस्त्यांच्या समुहाला गाव घोषीत केलेले आहे. करीता त्यात खालीलप्रमाणे दुरूस्ती वाचावी.—

**च्या ऐवजी**

त्याअर्थी, आता, मी, डॉ. संजीवकुमार, विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर पेसा नियमाच्या नियम ४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून **कुंभीटोला** येथे वस्त्यांच्या समुहास पेसा नियम ४ अंतर्गत गाव घोषीत करीत आहे.

**असे वाचावे**

त्याअर्थी, आता, मी, डॉ. संजीवकुमार, विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर पेसा नियमाच्या नियम ४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून **आगरी** येथे वस्त्यांच्या समुहास पेसा नियम ४ अंतर्गत गाव घोषीत करीत आहे.

**डॉ. संजीवकुमार,**
विभागीय आयुक्त,
नागपूर विभाग, नागपूर.

नागपूर :
दिनांक १७ फेब्रुवारी २०२१.

## पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकांना प्रसिद्ध झालेल्या आहेत.

---

५

---

**बुधवार, फेब्रुवारी २४, २०२१/फाल्गुन ५, शके १९४२**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु) म. शा. रा., अ, क्र. ८.

### नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२१

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-२२१९-२४५६-प्र.क्र.१०-२०२०-नवि-९.—

ज्याअर्थी, ब्रम्हपुरी शहराची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधले आहे) चे कलम ३१(१) अन्वये नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीएस-२२९९-१००१-प्र.क्र.१११-नवि-९, दिनांक २८ जून २००२ अन्वये भागशः मंजुर झालेली असून सदर विकास योजना दिनांक २६ ऑगस्ट २००२ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन नगर विकास अधिसूचना क्र. टिपीएस-२२९९-१००१-प्र.क्र.१११-नवि-९, दि. १३ जुलै, २००५ मंजूर झाली आहे. (" उक्त विकास योजना " असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, मौजे देलनवाडी येथील सर्व्हे क्र. ११४ क्षेत्र १.०८ हेक्टर पैकी अंदाजे ०.६८५ हेक्टर जागा कृषी विभागामध्ये समाविष्ट आहे (यापुढे " उक्त जागा " असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, ब्रम्हपुरी नगर परिषद, ब्रम्हपुरी, नियोजन प्राधिकरण यांनी (यापुढे " उक्त नियोजन " प्राधिकरण असे संबोधले आहे) म्हणून, त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ०१, दिनांक ०९-१०-२०१८ नुसार उक्त जागा वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याचे ठरवून, त्या अनुषंगाने, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप कलम (१) मध्ये नमूद वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन फेरबदल प्रस्तावास मंजूरीसाठी शासनास सादर केलेला आहे (यापुढे " प्रस्तावित फेरबदल " असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशीनंतर व संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त प्रस्तावित फेरबदल काही अटीसह मान्य करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जागेच्या मालकांनी सन २०२०-२१ या वर्षातील बाजारमूल्यदर तक्त्यानुसार येणा-या दराच्या ५ टक्के दराने येणा-या अधिमूल्य रक्कमेपैकी शासनास देय असलेली अधिमुल्याची ५० टक्के रक्कम रुपये २५,४००/- सहायक संचालक नगर रचना, चंद्रपूर शाखा, चंद्रपूर यांचेकडील लेखाशिर्षामध्ये दिनांक ०८ डिसेंबर २०२० रोजी जमा केलेली आहे आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५० टक्के अधिमूल्याची रक्कम रुपये २५,४००/- मुख्याधिकारी, ब्रम्हपुरी नगर परिषद, ब्रम्हपुरी यांचेकडे दिनांक १८ डिसेंबर २०२० रोजी जमा केलेली आहे.

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलास शासन पुढील प्रमाणे मान्यता देत आहे आणि त्यासाठी उपरोल्लिखित दिनांक २८ जुलै २००२ ची विकास योजना मंजुरीची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे.

उक्त विकास योजना मंजुरीच्या दिनांक २८-०६-२००२ च्या अधिसूचनेच्या फेरबदल सुचितील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

**नोंद**

मौजे ब्रम्हपुरी येथील सर्व्हे क्र. ११४ क्षेत्र १.०८ हेक्टर पैकी अंदाजे ०.६८५ हेक्टर मधिल सोबतच्या नकाशात दर्शविल्यानुसार उक्त जागा कृषी विभागातुन वगळण्यात येऊन रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

**अट क्र. १ —** उपरोक्त मुलभूत सुविधांचा विकास क्रमाने करताना एकूण अपेक्षित सुविधांचा विकास टप्प्याने होत असताना अर्जदारावर, एकूण जागेच्या भूखंड विक्रीवर खालीलप्रमाणे बंधन राहील. मुख्याधिकारी, ब्रम्हपुरी नगर परिषद, यांनी सदर बाबीवर नियंत्रण ठेवावे.

| | | |
|---|---|---|
| (क) | अभिन्यास अंतिमतमंजूर झाल्यावर : | एकूण २५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ख) | सुमारे ४०% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण ५०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ग) | सुमारे ६०% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण ७५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (घ) | सुमारे ८०% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण ९०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ड) | सुमारे १००% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण १००% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |

**अट क्र. २ —** नियमाप्रमाणे आवश्यक खुल्या जागेसह १०% अतिरिक्त जागा सुविधा क्षेत्र म्हणून प्रस्तावित करुन टीडीआर/चटई, निर्देशांकाच्या बदल्यात नगर परिषदेस हस्तांतरीत करणे आवश्यक रहील.

**अट क्र. ३ —** १८.०० मीटर विकास योजना रस्त्याने बाधित होणारे क्षेत्र कायम ठेवण्यात यावे.

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारी प्रस्तुत अधिसूचना/भाग नकाशा मुख्याधिकारी, ब्रम्हपुरी नगर परिषद, ब्रम्हपुरी यांच्या कार्यालयात, नागरीकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात येत आहे.

सदर अधिसूचना शासनाच्या **www.maharashtra.gov.in** (कायदे व नियम) या संकेत स्थळावर देखील उपलब्ध आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**प्रणव कर्पे,**
कार्यासन अधिकारी.

---

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु) म. शा. रा., अ, क्र. ९.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai-400 032, Date - 09th February, 2021

THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS-2219-2456-C.R.10-2020-UD-9.—

Whereas, the Government in Urban Development Department vide Notification No. TPS-2299-1001-C.R.111-UD-9, dated 28 June 2002 has sanctioned the development plan for the Bramhapuri Town & came into force with effect from the 26-08-2002 and excluding part of the Development Plan has been sanctioned by the Government *vide* Urban Development Department's Notification No. TPS-2299-1001-C.R.111-UD-9, dated the 13-07-2005 (hereinafter referred to as "the said Development Plan") under section31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. Act. No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act");

And whereas, in the said Development Plan, out of area admeasuring 0.685 Hector of the total area 1.08 Hector of land bearing Survey No. 114 of Mouje Delanwadi are included in " Agriculture Zone" (hereinafter referred to as "the said Lands");

And whereas, the Bramhapuri Municipal Council being the Planning Authority (hereinafter referred to as "the said Planning Authority"), vide its General Body Resolution No. 01, dated 09-10-2018 has resolved to delete the said Lands and include the same in Residential Zone and accordingly submitted a modification proposal to the Government, for its sanction as per the provisions of sub section (1) of section 37 of the said Act, (hereinafter referred to as "the Proposed Modification");

And whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune the Government is of opinion that the proposed Modification should be sanction with some conditions;

And whereas, the said Lands Owners have deposited Rs. 25,400/- towards the 50% Government share of 5% premium amount as per the rate of the said lands as prescribed in the Annual Statement of Rates (ASR) for the year 2020-21 in the Government Treasury on 08-12-2020 through the Assistant Direcor of Town Planning, Chandrapur Branch, Chandrapur and remaining 50% of the 5% premium amount Rs. 25,400/- payable to the Planning Authority has been deposited with the Chief Officer, Bramhapuri Municipal Council on 18 February 2020;

Now therefore, in exercise of the powers conferred on it under sub section (2) of section 37 of the said Act, the Government hereby, sanctions the proposed Modification and for that purpose amends the aforesaid Notification dated 28-06-2002 as follows;

"In the Schedule of Modifications appended to the Notification dated 28-06-2002 sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry.—

*ENTRY*

"The out of area admeasuring 0.685 Hector of the total area 1.08 Hector of land bearing Survey No. 114 of Mouje Delanwadi is deleted from Agriculture Zone and is included in Residential Zone as shown on the plan.

*Condition No. 1*— If the land is proposed to be developed by way of plotted layout, then sale of plots under such layout shall be monitored by the Chief Officer, Bramhapuri Municipal Council in relation to development of basic amenities as per the stages given below.

| | | |
|---|---|---|
| (a) | After final approval of layout | sale of 25% of the total plots shall be permissible. |
| (b) | After completion of 40% basic Amenities. | sale of 50% of the total plots shall be permissible. |
| (c) | After completion of 60% basic Amenities. | sale of 75% of the total plots shall be permissible. |
| (d) | After completion of 80% basic Amenities. | sale of 90% of the total plots shall be permissible. |
| (e) | After completion of 100% basic Amenities. | sale of 100% of the total plots shall be permissible. |

*Condition No. 2*— In addition to open space, necessary 10% additional Amenity Space shall be provided & handover to Municipal Council instate of T.D.R./F.S.I.

*Condition No. 3*— The area affected by 18.00 Mt. wide Development Plan Road is retained.

A copy of the Notification, along with the part plan showing the aforesaid sanctioned modification, shall be available for inspection of the general public, in the office of the Chief Officer, Bramhapur Municipal Council during office hours on all working days for a period of one month.

This Notification shall also be available on the Government web site - *www.maharashtra.gov.in* (Act and Rule).

*By order and in the name of the Governor of Maharashtra,*

PRANAV KARPE,
Section Officer.

६

शुक्रवार, फेब्रुवारी २६, २०२१/फाल्गुन ७, शके १९४२

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०.

## जिल्हाधिकारी, यांजकडून

### आदेश

क्रमांक अका-नपाप्र-आस्था-कावि-३२३-२०२१.—

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१(१) व महाराष्ट्र नगर परिषदा आणि नगर पंचायती (अध्यक्ष पदाची निवडणूक) नियम, १९८१ मधील नियम ७क मधील तरतुदीनुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मी, प्रेरणा देशभ्रतार (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी, वर्धा या प्रकटनाद्वारे जाहीर करते की, वर्धा जिल्हा अंतर्गत सिंदी (रे.) नगर परिषदेच्या दिनांक १५ फेब्रुवारी २०२१ रोजी घेण्यात आलेल्या विशेष सभेत, अध्यक्ष पदाचे निवडणुकीमध्ये खालील अनुसूचित दर्शविल्याप्रमाणे अध्यक्ष म्हणून निवडून आल्या आहेत.–

### अनुसूची

| अ. क्र. | नगर परिषदेचे नाव | निवडणुकीचा दिनांक | निवडून आलेल्या अध्यक्षाचे नाव | शेरा (जर पद आरक्षित असेल तर भरावयाचा तपशील) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | सिंदी (रे.) | १५ फेब्रुवारी २०२१ | सौ. बबीता प्रभाकर तुमाणे | अनुसूचित जाती (महिला) |

**प्रेरणा देशभ्रतार** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी,
वर्धा.

वर्धा :
दिनांक २४ फेब्रुवारी २०२१.

ना.-एक-अ-२ (१७३७).

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ११.

BY COLLECTOR

*ORDER*

No. AK-NP-ELE-WS-326-2021.—

In exercise of the power vested to me under Section 51(*1*) of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 & as per rule 7C of Maharashtra Municipal Councils and *Nagar Panchayats* (President Election) rules, 1981. I, Prerana Deshbhratar (I.A.S.), Collector, Wardha hereby publish the name of President Elected in a Special Meeting held on 15th February 2021 of Sindi (Rly.), Municipal Council as per the schedule given below.—

SCHEDULE

| Sr. No. | Name of Nagar Parishad | Date of Election | Name of President | Remarks (Whether the seat reserved and if so for whom) |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | Sindi (Rly.) | 15th February 2021 | Sau. Babita Prabhakar Tumane | Scheduled Castes (Woman) |

PRERANA DESHBHRATAR (I.A.S.),
Collector,
Wardha.

Wardha :
Dated the 24th February 2021.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.